**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, NOV-DEC, 2018, VOL- 6/48*

**महात्मा जोतीराव फुले यांच्या शैक्षणिक विचारांचे सद्यकालीन उपयोजन**

**सौ. शोभा नेताजी जाधव**

***अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे***

**Abstract**

***प्रस्तुत शोधनिबंधात महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार व त्यांचे सद्यकालीन उपयोजन यावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. महात्मा जोतीराव फुले यांनी आपले शिक्षणविषयक विचार विविध पुस्तकांमधून प्रकट केले आहेत. तसेच हंटर कमिशन पुढे त्यांनी आपले विचार मांडले. शिक्षणाच्या अभावी माणूस नैतिक व बौद्धीकदृष्ट्या खालावतो आणि त्यामुळे त्याची व्यावहारिक व आर्थिक क्षेत्रात पीछेहाट होते. तो आपले धैर्य गमावतो. हे महात्मा फुले यांच्या शिक्षणविषयक विचारांचे सार सांगता येईल. सध्या शिक्षणात दिसून येणारी गळती, मूल्यांचा होणारा ऱ्हास, सामाजिक परिस्थिती, शिक्षित स्वार्थी समाज या सर्व कारणामुळे महात्मा फुलेंचे विचार सद्य काळात अत्यंत उपयुक्त आहेत.***

***पारिभाषिक शब्द– बहुजन समाज, समता, समाज परिवर्तन, मानवतावाद, सार्वत्रिकीकरण, अस्पृश्यता***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना—**

**समाज परिवर्तन आणि मानवी विकास यासाठी शिक्षण हे एक अत्यंत प्रभावी साधन आहे, म्हणूनच समाज परिवर्तन व विकासासाठी अधिकाधिक चांगले शिक्षण घेण्याची व देण्याची धडपड चाललेली आहे. अनेक राष्ट्रांनी उत्तम शिक्षण पद्धतीद्वारे सर्वांगीण विकास धडवून आणण्याचे प्रयत्न केलेत. असेच प्रयत्न काही व्यक्तींनी महाराष्ट्रातही केले आहेत.**

**महात्मा जोतीराव फुले हे क्रांतिकारक, समाजसुधारक, थोर विचारवंत आणि प्रबोधक साहित्यिक होते. बहुजन समाजाच्या मुला मुलींसाठी शाळा काढणारे पहिले भारतीय, भारतातील स्त्री शिक्षणाचे जनक, भारतीय स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य यांची जाणीव करून देणारे महामानव, शेतकरी व कामगार यांची दुखे आणि दारिद्र्य निवारण करण्यासाठी चळवळ उभारणारे सामाजिक कार्यकर्ते, मानवी समानतेची घोषणा करणारे, सत्याचा शोध घेणारे सत्यशोधक होते. 'त्यांना महात्मा गांधींनी 'महात्मा' म्हणून गौरविले. सावरकरांनी समाज क्रांतिकारक म्हणून त्यांची प्रशंसा केली. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

यांनी त्यांना गुरु मानले. यावरूनच महात्मा फुले यांचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. त्यांनी स्त्रिया आणि अस्पृश्य यांच्या शिक्षणासाठी बहुमोल असे प्रयत्न केले. खरे तर त्यांना स्त्री शिक्षणाचे जनक असे म्हटले जाते.

**महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार-**

शिक्षणाचा संबंध सामान्याच्या जीवनाशी व दैनंदिन गरजांशी जोडणे, शिक्षणाचा विचार समाज सापेक्ष संदर्भात करणे, वरिष्ठ वर्गाना अतिशिक्षित करण्यापेक्षा बहुसंख्य निम्नवर्गाला पुरेसे सुशिक्षित करण्यावर भर देणे, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व सार्वत्रिक करणे, तसेच दारिद्र्य, अंधश्रद्धा, रुढी-परंपरा असे अडसर शिक्षणाच्या आड येतात ते दूर सारणे, शिक्षक प्रशिक्षित असणे. शाळांची गुणवत्ता वाढावी यासाठी शाळांचे दर तीन महिन्यांनी पर्यवेक्षण करणे, शासकीय शाळा व खाजगी शाळांचे व्यवस्थापन याची जबाबदारी सरकारने घेणे. खाजगी महाविद्यालयांना अनुदान देणे, खाजगी रितीने परीक्षेची तयारी करणाऱ्यांना परीक्षेस बसू देणे, वंचितांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून संरक्षणे, प्रलोभने देणे, स्वतंत्र व्यवसाय करता येईल अशा शिक्षणावर भर देणे ही महात्मा फुले यांच्या शिक्षण विषयक विचाराची पायाभूत सूत्रे सांगता येतील.

**महात्मा फुले यांनी सांगितलेला अभ्यासक्रम-**

पर्यावरणानुरूप शिक्षणाचा आशय असावा. प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा काही भाग तरी सक्तीच्या व्यवसाय शिक्षणाचा असणे आवश्यक आहे. व्यावहारिक ज्ञान देणे , मोडी, बाळबोध, लेखन, वाचन, इतिहास, भूगोल, व्याकरण, नीती, या विषयांचे पाठ ठेवावेत. ग्रामीण, भाग व शहरी भागातील अभ्यासक्रम वेगळा असावा.

**शिक्षणाचा प्रतित होणारा अर्थ–**

शिक्षण हे सर्व सुधारणेचे मूळ आहे म्हणून शिक्षणातून श्रमप्रधान अनुभूतीन्द्वारा आर्थिक व सामाजिक समता प्रस्थपित करून उच्च दर्जाचा सामाजिक न्याय मिळवून देणे, तसेच व्यक्तिस्वातंत्र, सद्सद्विवेक व प्रतिभा विकसित करून जातीभेदरहित, सुसंस्कृत, मानवतावादी समाजाची निर्मिती

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

करणे म्हणजे शिक्षण होय. असा शिक्षणाचा अर्थ महात्मा फुले यांनी मांडलेल्या विचारातून सांगता येईल.

**शिक्षणाची उद्दिष्टे-**

१) शिक्षणाद्वारे व्यक्तीस व्यवसाय करण्यास समर्थ बनविणे.

२) धर्म, वंश, जात, व लिंग याचा विचार ना करता व्यक्तीमध्ये मानवतावादाची मूल्ये विकसित करणे.

३) शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून स्त्रिया व वंचित राहिलेला बहुजन समाज व उपेक्षित घटक यांना अग्रक्रमाने शिक्षण व न्याय प्रस्थापित करणे.

४) स्वातंत्र्य, समता व बंधुप्रेम ही चिरस्थायी मूल्ये विकसित करून व्यक्तीमत्वाचा चांगला विकास घडविणे व प्रखर राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान, विश्वबंधुत्व व मानवाबद्दलची सहृदयता ही मूल्ये रुजविणे.

५) व्यक्तीला चांगले- वाईट, सत्य-असत्य याची जाण येणेकरिता चिकित्सक दृष्टीकोन विकसित करणे.

६) व्यक्तीची सद्सद्विवेक बुद्धी, प्रतिभा आणि व्यक्तिस्वातंत्र्य विकसित करणे.

७) शिक्षणाद्वारे चारित्र्य संवर्धन करणे.

८) अंधश्रद्धा, अस्पृश्यतेचे निर्मूलन करणे.

ही महात्मा फुले यांच्या विचारातून शिक्षणाची उद्दिष्टे सांगता येतील.

**शैक्षणिक तत्वज्ञान–**

महात्मा फुले यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानात, सामाजिक एकतेसाठी एकाच ईश्वर असावा. ज्यास त्यांनी निर्मिक असे संबोधले, म्हणजेच एकेश्वरवाद दिसून येतो. तसेच शिक्षणाने मानवास सामाजिक शोषण, गुलामी, अंधश्रद्धा याविरुद्ध लढण्याचे भान यावे असे सांगितले म्हणजेच सामाजिक वास्तववाद आहे. शिक्षणातून सर्वांनाच मनुष्यकर्तृत्व दाखविण्याची संधी मिळावी ही विचारसरणी होती. यावरून

**असे म्हणता येईल की, महात्मा फुले यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानात अध्यात्मवाद, सामाजिक वास्तववाद व कार्यवाद दिसून येतो.**

**शिक्षणविषयक विचार-**

**१) शुद्रतिशूद्रांना शिक्षणाने अन्यायाची जाणीव होईल आणि जर त्यांनी शिक्षण नाही घेतले, तर त्याचे परिणाम पुढील पिढीला भोगावे लागतील.**

**२) उद्‍योग म्हणजे सदासर्वकाळ मेहनत करणे यात विद्‍याभ्यास करणे, शेतीत राबणे,व्यापारधंदा करणे की ज्यायोगे उपजीविका होईल. बुद्धीमुळे विविध शोध लावले जाऊ शकतात. त्याचा उपयोग मनुष्यत्व वाढविण्यासाठी होतो.**

**३) विद्‍या देणारा व घेणारा दोघेही खरीखुरी मनसे बनतात. विद्‍या देणारा धैर्यशाली, निर्भय तर विद्‍या घेणारा सामर्थ्यशाली, शहाणा बनतो.**

**४) ज्ञानामुळे उपजीविकेचा मार्ग उपलब्ध होतो, तसेच व्यक्तीतील नीचता दूर पळून उच्चतेचा अंगीकार होतो.**

**५) विद्‍या असल्याने सत्यासत्य ओळखता येते व व्यक्ती सदाचरणी बनून अधिक सुखी होते; असे शिक्षणविषयक विचार त्यांनी मांडले.**

**शिक्षणविषयक इतर विचार-**

**मानवतावाद-**

**मानवी हक्क, मानवी समानता व मानवाची प्रतिष्ठा या तीन गोष्टी महात्मा फुले यांच्या तत्वज्ञानाच्या आधार होत्या.**

**शिक्षण व समता यांची सांगड-**

**स्त्रिया व कनिष्ठ लोक यांना शिक्षण दिले तर त्यांना सामाजिक समतेचे भान येईल, म्हणून महात्मा फुले यांनी शिक्षण व समता यांची सांगड घातली.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**पाझर सिद्धांताला विरोध-**

**महात्मा फुले यांनी शिक्षणाच्या पाझर सिद्धांताला ठामपणे विरोध केला. बहुजनांसाठी हा सिद्धांत अन्यायकारक आहे. सर्वांना मानवी हक्क म्हणून शिक्षण दिले पाहिजे हा विचार मांडला.**

**शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण-**

**शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची कल्पना सर्वप्रथम महात्मा फुले यांनी पुढील शब्दात मांडली- जात, धर्म, पंथ, लिंग,व शारिरीक अपंगत्व याचा अडसर ना ठेवता समाजातील सर्वांना समानतेच्या तत्वावर शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे होय.**

**स्त्री-पुरुष समानता-**

**महात्मा फुले यांनी स्त्री- पुरुष समान आहेत. स्त्रियांनाही शिक्षणाचा अधिकार असावा, त्यानाही शिक्षण दिले जावे असा विचार मांडून मुलींसाठी शाळा काढून तो प्रत्यक्षात उतरविला.**

**स्त्रिया व बहुजन समाजाकडे विशेष लक्ष-**

**स्त्रिया व बहुजन समाज यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे. या वर्गांना शिक्षणाची गोडी लागावी यासाठी त्यांना विशेष प्रलोभने, आकर्षणे दिली जावीत. शिष्यवृत्त्या आणि बक्षिसे यांची तरतूद करावी. मोफत जेवण, कपडेलत्ते, व पुस्तके पुरवावीत, वसतीगृहाची सोय करावी. शिक्षण पूर्ण होताच अग्रक्रमाने सरकारी नोकऱ्या द्याव्यात. असे विचार मांडून आजच्या 'राखीव जागां'च्या धोरणाच्या विचारांचा पाया घातला.**

**जोतीराव फुले यांच्या शैक्षणिक विचारांचे सद्यकालीन उपयोजन –**

**शिक्षण प्रसार अपुरा-**

**आजही महाराष्ट्रात १०० % साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य झालेले नाही. यात स्त्रिया, आदिवासी, जाती-जमातीतील मुले यांचा समावेश होतो. म्हणजेच शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झालेले नाही. यावरून असे म्हणता येईल की, सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे महात्मा फुले यांचे विचार व त्यावर आधारित कार्याची आवश्यकता आज आहे.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**शिक्षण व सामाजिक परिस्थिती-**

**शिक्षणाचे खासगीकरण व आर्थिक विषमतेमुळे मुलांची सामाजिक परिस्थितीही वेगळी आहे. याचा परिणाम संबंधित मुलांच्या शिक्षणावर होत आहे. यावरून महात्मा फुले यांचा 'शिक्षणात समानता' हा विचार आजही उपयुक्त आहे.**

**शिक्षणातील गळती-**

**आदिवासी, कामगार, मजूर यांची मुले, तसेच स्त्रिया यांच्या शिक्षणासाठी विविध योजना असून देखील त्यांची गळती होत आहे. यासाठी कौटुंबिक, आर्थिक, कारणांबरोबर जीवनाभिमुख अभ्यासक्रम, व्यवसायपूरक शिक्षण हे विचार आणि त्यांनी गळती थांबविण्यासाठी योजलेले उपाय जसे उपस्थिती भत्ता, पालकांचे प्रबोधन इत्यादी. हेही आज आवश्यक आहेत.**

**मूल्याशिक्षणाची गरज-**

**शिक्षणातून अपेक्षित मूल्ये साध्य झालेली नाहीत. आजही स्त्रिया, मुले व मुली यांच्यावर अन्याय, अत्याचार होत आहेत, स्त्रीभ्रूणहत्या होत आहेत, अंधश्रद्धा आजही काही प्रमाणात आहे. तसेच भ्रष्टाचार व दहशतवादात दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांचा सत्यासत्य ओळखण्याची शक्ती, तार्किक विचार दृष्टी हे विचार आजही उपयुक्त आहेत.**

**स्वार्थी समाज-**

**आज शिक्षित व्यक्ती ही स्वतःच्या विकासाचा विचार करते आहे. त्यामुळे समाजात स्वार्थी वृत्ती वाढत आहे. सामाजिक बांधिलकी कमी प्रमाणात दिसून येत आहे. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांचा 'सुशिक्षित व्यक्तीने समाज परिवर्तनाला सहाय्यभूत ठरावे' हा विचार उपयुक्त आहे.**

**सद्यस्थितीतील समस्या-**

**आज बांधकाम मजूर, उसतोड कामगार, वेश्या यांच्या मुलांचे शिक्षण, परित्यक्त्या स्त्रिया, विधवा, देवदासी व त्यांची मुले, अनाथ मुले यांना मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. यासाठी महात्मा फुले**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**यांच्या शिक्षणविषयक विचारांबरोबरच त्यांनी ज्या कळकळीने व सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून कार्य केले तसेच कार्य आजच्या परिस्थितीतही उपयुक्त आहेत.**

**समारोप-**

**महात्मा फुले यांचे तत्वज्ञान मानवाची प्रतिष्ठा, धार्मिक सहिष्णुता, मानवी हक्क, मानवी समानता, यांचा संदेश देते. आजही सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात महात्मा फुले यांचा आदर्श मानणारी मंडळी असंख्य आहेत. सत्यशोधक समाजाची स्थापना आणि शिक्षणक्षेत्रातील त्यांची कामगिरी अत्यंत उल्लेखनीय आहे.**

**१९ व्या शतकात आपल्या समाजामध्ये ज्या प्रबोधनाला आरंभ झाला. त्याच्या मुळाशी महात्मा फुले यांचे विचार आहेत. सत्य, न्याय, आणि समताधिष्ठित, ज्ञानोंमुख आणि कर्तव्यनिष्ठ असा एकात्म समाज निर्माण करण्याचे महात्मा फुले यांचे स्वप्न अजूनही पूर्ण झालेले नाही. त्यामुळे त्यांच्या विचारांचा आजही अभ्यास करणे आवश्यक ठरते. भारतातील व महाराष्ट्रातील वैचारिक व शैक्षणिक परिस्थिती पाहता, पुन्हा एकदा महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचार व कार्याचा मागोवा घेणे महत्वपूर्ण ठरेल यात शंका नाही.**

**Bibliography**

*धनंजय कीर,. (१९६८). महात्मा जोतीराव फुले.मुंबई: पोपुलर प्रकाशन.*

*पंढरीनाथ पाटील, (१९९०). महात्मा जोतिबा फुले यांचे चरित्र.पुणे: राजेश प्रकाशन.*

*पवारना. ग. अविनाश वारोकर. (२००४). भारतीय समाज क्रांतीचे जनकः महात्मा जोतीराव फुले.पुणे: पद्मगंधा प्रकाशन.*

*शास्त्री, ज. ल. (२००३). जोती चारित्र.नवी दिल्ली: नॅशनल प्रकाशन.*

*श्रीराम, ग. (१९९२). महात्मा जोतिबा फुले- विचार आणि वाङ्मय.पुणे: प्रतिमा प्रकाशन.*

*हरी, नरके (१९९३). आम्ही पाहिलेले फुले.मुंबई: महात्मा फुले चरित्र साधने, प्रकाशन समिती.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*